बीड । रविवार
०२.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३२३
किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१






# एमबीबीएस प्रवेशात चांगल्या विद्यार्थ्यांचे पाय ओढले जातात

## हायकोर्टाचे गंभीर निरीक्षण

**मुंबई** । प्रतिनिधी

आपला समाज अशा स्तरावर गेला आहे की, एमबीबीएस प्रवेशात चांगल्या विद्यार्थ्यांचे पाय त्यांचेच सहकारी विद्यार्थी ओढतात, असे गंभीर निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. अमूक एका कॉलेजमध्येच एमबीबीएस प्रवेश मिळावा यासाठी पालक- विद्यार्थ्यांमधील अस्वस्थता दुर्दैवी आहे, असेही न्या. अतुल चांदुरकर व न्या. मिलिंद साठ्ये यांच्या खंडपीठाने नमूद केले. अखिलेश छोटे या विद्यार्थ्याने ही याचिका केली होती. या विद्यार्थ्याला नागपूर येथील सरकारी महाविद्यालयात प्रवेश मिळाला आहे. मात्र नियमानुसार प्रवेश प्रक्रिया झाली तर मला नायर मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळू शकेल, असा दावा याचिकेत करण्यात आला होता. अन्य विद्यार्थ्यांना डावलण्याचा हेतू अन्य विद्यार्थ्यांना डावलून ठरावीक कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याच्या अतृप्त इच्छेसाठी ही याचिका करण्यात आली होती. अशा याचिकेवर सुनावणी घेण्यात आमचा वेळ वाया गेला, असे स्पष्ट करत खंडपीठाने ही याचिका फेटाळली. माणसाची लालसा संपत नाही. माणसाची लालसा कधीही संपत नाही याचे ही याचिका उत्तम उदाहरण आहे. कारण अखिलेश अल्पवयीन आहे. वडिलांच्या मार्फत त्याने ही याचिका केली होती आणि त्याचे वडील डॉक्टर आहेत, असे मत न्यायालयाने व्यक्त केले.

# अंबाजोगाई कृषी तंत्र विद्यालयातील वसतिगृहांसाठी तीस कोटींचा निधी

## आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश

**अंबाजोगाई** । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील कृषि तंत्र विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आणि विद्यार्थिनींसाठी नवीन वसतिगृह इमारतींसाठी तब्बल तीस कोटी रुपयांचा निधीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. यापैकी दोन कोटींचा निधी वितरीत करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांच्या मागणीनंतर महाराष्ट्र शासनाच्या



वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या अंतर्गत हा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. कृषि तंत्र विद्यालयातील विद्यार्थ्यांन निवासासाठी चांगली इमारत असावी यासाठी आ. नमिता मुंदडा प्रयत्नशील होत्या. वसतिगृह इमारती बांधण्याकरिता निधी मिळविण्यासाठी आमदार नमिता मुंदडा यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला होता. त्यांचा सातत्यपूर्ण आग्रह आणि पत्रव्यवहार लक्षात घेऊन शासनाने विद्यार्थ्यांसाठी आणि विद्यार्थिनींसाठी नवीन वसतिगृह

▶▶ उर्वरित पान २ वर

# वाल्मिक कराडच्या प्रश्नावर पंकजाताई चिडल्या



**पुणे** । प्रतिनिधी

बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणामध्ये सीआयडीने न्यायालयात तब्बल १५०० पानांचे दोषारोपपत्र दाखल केले आहे. या दोषारोपपत्रातून अनेक धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे देशमुख यांच्या हत्या प्रकरणात थेट वाल्मिक कराड यांच्यावर गुन्हा दाखल झाला नव्हता. कराडला केज येथील खंडणीच्या गुन्हाअंतर्गत अटक करण्यात आली होती. मात्र, संतोष देशमुख यांच्या हत्येचा

▶▶ उर्वरित पान २ वर

# स्वारगेट बलात्कार प्रकरणानंतर एसटी महामंडळाचा मोठा निर्णय

**मुंबई** । प्रतिनिधी

पुण्यातील स्वारगेट बस आगारात उभ्या असलेल्या एसटीत एका २६ वर्षीय तरुणीवर अत्याचार करण्यात आल्याची घटना समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील आरोपी दत्ता गाडे याला पोलिसांनी अटक केली आहे. मात्र, बस स्थानकात अशा प्रकारची घटना घडल्याने एसटी महामंडळ निशाण्यावर आले आहे. या सगळ्या प्रकरणानंतर राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने एक मोठा निर्णय घेतला आहे. स्वारगेट




शिवशाही प्रकरणानंतर राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने जनमानसात प्रतिमा मलीन होणे आणि प्रवासी सुरक्षेचे कारण देत गणवेश सक्तीचे आदेश एसटी मुख्यालयाने काढले आहेत. दरम्यान, आदेशाबाबत एसटी

▶▶ उर्वरित पान २ वर

# सोमवारपर्यंत धनंजय मुंडेंचा राजीनामा घेतला नाही तर आम्ही पेटून उठू

## अंजली दमानियांचा जाहीर इशारा

**बीड** । प्रतिनिधी

येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात (डर्पींह ऊशीर्हीज्ञह चींवशी उरीश) मंत्री धनंजय मुंडे (ऊहरपरपक्षरू चींपवश) यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड (थरश्राळज्ञ घरीरव) हाच सूत्रधार असल्याचे पोलिसांनी दाखल केलेला आरोप पत्रातून समोर आले आहे. ट्रॉसिटी, खंडणी आणि हत्या या तिन्ही घटनांचा एकत्रित उल्लेख आरोपपत्रातून करण्यात आला आहे. यानंतर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी जोरदार हल्लाबोल केलाय. धनंजय मुंडे यांच्यासारखी माणसे राजकारणात असली तर अनेक वाल्मिक कराड



तयार होतील, असे त्यांनी म्हटले आहे. तर सोमवारपर्यंत धनंजय मुंडेंचा राजीनामा घेतला नाही तर आम्ही पेटून उठू, असा जाहीर इशारा देखील त्यांनी दिला आहे. अंजली दमानिया पत्रकार परिषदेत म्हणाल्या की, आज चार्जशीट दाखल झालेली आहे. धनंजय मुंडे यांना कराडला वाचवायचे होते, यासाठी वेगवेगळे गुन्हे दाखल केले. ६ तारखेला जी मारामारी झाली, त्यानंतर सुदर्शन घुले आणि वाल्मिक कराड यांचे बोलणे झाले. धनंजय मुंडे यांच्यासारखी माणसे राजकारणात असली तर अनेक वाल्मिक कराड तयार होतील. १० वर्ष या सर्वांचे सिंडीकेट होते, असा आरोप त्यांनी केला. अंजली दमानिया पुढे म्हणाल्या की, धनंजय मुंडे यांना बडतर्फ करावे. वाल्मिक कराड हाच खरा यात सूत्रधार होता. सातपुडा येथे बैठक झालेली होती. बीडमध्ये १०७ अधिकाऱ्यांनी बदली करून घेतली. जर सोमवारपर्यंत धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला नाही तर आम्ही पेटून उठू. धनंजय मुंडे यांचे अस्तित्व कराडमुळेच आहे. या प्रकरणात राजकीय दबाव होता. ते उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या जवळचे असल्यानेच हे घडले, असा हल्लाबोल त्यांनी केला आहे.

दरम्यान, अंजली दमानिया यांनी म्हटले आहे की, दरम्यान, राज्यात राजकीय दहशत असावी तरी किती? हे यातून दिसून आले आहे. किंबहुना या प्रकरणात जर कोणी म्हणत असेल की यात मंत्री धनंजय मुंडे यांचा सहभाग नव्हता, तर ते मी कधीही मान्य करणार नाही. वाल्मिक कराड आज मोठा होण्यामागचे कारण फक्त आणि फक्त धनंजय मुंडेच आहे. त्यांच्याशिवाय दुसरं-तिसरं कोणीही नाही, असे त्यांनी म्हटले.

# अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात बीड जिल्ह्याचा कायापालट होईल

## बीड विधानसभा मतदारसंघातून जिल्ह्यात सर्वाधिक सदस्य नोंदणी करावी; डॉ.योगेश क्षीरसागर यांचे प्रतिपादन; बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सदस्य नोंदणी सुरु



**बीड** । प्रतिनिधी

अजितदादा पवार यांच्याकडे बीड जिल्ह्याचे पालकत्व असून आता जिल्ह्याचा कायापालट होईल. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटन देखील मजबूत केले जात आहे. जिल्ह्यात बीड विधानसभा मतदारसंघातून सर्वाधिक सदस्य नोंदणी करावी, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

बीडमध्ये के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात शनिवारी (दि.१) करण्यात आली.

▶▶ उर्वरित पान २ वर




# आरटीई अंतर्गत मिळणाऱ्या गोरगरिबांच्या प्रवेशावर डल्ला मारण्यासाठी खोटी कागदपत्रे सादर

## खोटी कागदपत्रे सादर करून तीन शाळात पालकांनी मिळवले प्रवेश ; मनोज जाधव यांची जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार

**बीड** । प्रतिनिधी

शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत आर्थिक दुर्बल, वंचित, गोरगरीब विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळेत मोफत प्रवेश मिळावा या हेतूने शासन आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवते मात्र या प्रवेश प्रक्रियेत खरे लाभार्थी विद्यार्थी वंचित राहत असून खोट्या कागद पत्रांच्या



आधारे धनदांडगेच गोरगरिबांच्या प्रवेशावर डल्ला मारण्याचे काम करत आहेत. यात शहरातील पोदार इंग्लिश स्कूल, गुरुकुल इंग्लिश स्कूल आणि संत ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल या तीन शाळेत प्रवेश मिळवा यासाठी पालकांनी अपडेट केलेले आधार कार्ड, खोटी भाडेपत्र आणि उत्पन्नाचे प्रमाणपत्र जोडली आहेत. या सर्व प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांची कागदपत्रे तपासून त्यांचे प्रवेश रद्द करण्यात यावेत अशी मागणी आरटीई कार्यकर्ते तथा शिवसंग्राम चे युवा नेते मनोज जाधव यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली आहे.

बीड शहरातील पोदार इंग्लिश स्कूल, गुरुकुल इंग्लिश स्कूल आणि

▶▶ उर्वरित पान २ वर

### आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी मुदतवाढ

**जिल्ह्यातील २१४ खासगी शाळांत २ हजार २३५ जागा आरटीई प्रवेशासाठी उपलब्ध होत्या या जागा करिता ५ हजार ७८१ इतके अर्ज प्राप्त झाले होते. यातून आता २ हजार १८३ विद्यार्थ्यांची मोफत प्रवेशासाठी निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी पर्यंत मुदत देण्यात आली होती मात्र आता ही मुदत १० मार्च पर्यंत वाढवण्यात आली आहे. आतापर्यंत जिल्ह्यात १ हजार २४६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत.**

# उत्तराखंड हिमस्खलनात ५० मजुरांना बाहेर काढले, ४ जणांचा मृत्यू, पाच जणांचा अजूनही शोध सुरु

**वृत्तसंस्था**

उत्तराखंडमधील चमोली हिमस्खलनात आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झाला आहे. दुर्घटनेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवारी १७ मजुरांची सुटका करण्यात आली. याआधी शुक्रवारी ३३ जणांची सुटका करण्यात आली होती. यातील ४ गंभीर जखमींचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ५ मजूर अद्याप बेपत्ता आहेत. काल २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.१५ वाजता चमोली येथील माना गावाजवळ हा अपघात झाला. बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनचे (बीआरओ) ५५ कामगार माळी-बद्रीनाथ महामार्गावर एका कंटेनरच्या घरात थांबले असताना ग्लेशियर कोसळले. त्याचा फटका सर्व कामगारांना बसला. लष्कराच्या ४ हेलिकॉप्टरशिवाय खढइझ, इठज, डऊछत्र आणि छऊछत्रचे २०० हून अधिक जवान बचावकार्यात गुंतले आहेत.

अडकलेल्या ५५ मजुरांमध्ये बिहारमधील ११, उत्तर प्रदेशातील ११, उत्तराखंडमधील ११, हिमाचल प्रदेशातील ७, जम्मू-काश्मीरमधील १ आणि पंजाबमधील १ मजुरांचा समावेश आहे. १३ मजुरांचा पत्ता व मोबाईल क्रमांक नाही. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी आज सकाळी घटनास्थळी जाऊन कामगारांची भेट घेतली. याआधी पंतप्रधान मोदींनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून बचाव कार्याचा आढावा घेतला.

# पवित्र रमजान मध्ये उपवास करून, पुण्य कमवण्याचा महिना




मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान पर्वास शनिवार ( १ मार्च ) पासून प्रारंभ झाला आहे . भारतात रविवारी ( २ मार्च ) पहिला रोजा ठेवला जाईल . इस्लाम धर्मात पवित्र 'रमजान'ला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात अल्लाहची विशेष इबादत ( उपासना ) केली जाते . मुस्लिम बांधवांकडून निरंकार रोजे ( उपवास ) पाळले जातात . रोजाबरोबरच नमाज , कुराण पठण , विशेष प्रार्थना आदींमार्फत अल्लाहची इबादत केली जाते . मुस्लिम धर्ममध्ये चांगल्या व्यक्तीला उत्तमरीत्या परिभाषित करण्यात आले आहे . यासाठी मुस्लिम असणेच पुरेसे नाही तर मूलभूत पाच कर्तव्यांचे पालन करणे आवश्यक आहे . पहिले इमान , दुसरे नमाज, तिसरे रोजा , चौथे हज आणि पाचवे जकात . इस्लाममध्ये सांगण्यात आलेले हे पाच कर्तव्य इस्लाम मानणाऱ्या व्यक्तीकडून प्रेम , सहानुभूती , मदत आणि आपलेपणाची इच्छा बाळगतात .

'रमजान' मांगल्याचे प्रतिक आहे . त्यामुळे याला कृपाप्रसादाचा महिनाही म्हणतात . पवित्र कुराणाचे अवतरण याच महिन्यातील एका रात्री झाल्याने ही रात्र हजार रात्रींपेक्षा वरचढ ठरली आहे . रमजानमध्ये रोजे म्हणजे उपवास अनिवार्य आहेत . या रात्रीत जास्त नमाज अदा करणे म्हणजे अल्लाहच्या समीप जाणे होय . नफील नमाजचा ( जादा नमाज ) मोबदला फर्ज (अनिवार्य नमाज ) इतका दिला जातो तर फर्ज ( अनिवार्य ) नमाजचा मोबदला सत्तर पटीने जास्त असतो . रोजाचा मूळ उद्देश : – रमजानमध्ये रोजा या शब्दाला अरबी भाषेत सोम म्हणतात , याचा अर्थ होतो थांबणे . रमजानच्या पवित्र महिन्यात सर्व दिवस ' रोजा ' (उपवास) करणारे सर्व ' रोजेदार ' दिवसभर अन्नपाणी घेत नाहीत . यासाठी शारीरिक आणि मानसिक संयमाची फार आवश्यकता असते . त्यामुळे आपल्या इंद्रियांना आणि मनाला एक शुचिर्भुत वळण लाभत . मन एकाग्र करायला सुद्धा याचा फार उपयोग होतो . त्याचप्रमाणे ' इबादत ' ( उपासना ) करण्यासाठीसुद्धा योग्य पार्श्वभूमी व मानसिकता निर्माण होते . संपूर्ण रमजान महिना हा जणू उपासनामय , प्रार्थनामय आणि भक्तिमय झालेला असतो . रमजान महिन्याचे तीन हिस्से : – रमजान इस्लामी दिनदर्शिकेनुसार नववा महिना असतो . रमजान महिन्याचा पहिला दशक ' कृपेचा ' , दुसरा दशक 'क्षमेचा' , तिसरा आणि अंतिम दशक नरकापासून 'मुक्ततेचा' मानला जातो . या काळात अल्लाह त्यास क्षमादान देईल व नरकापासून सुटका करून मुक्ती देईल . त्यामुळे वर्षभरातील अन्य अकरा महिन्यांत मिळणार्या नेकी ( पुण्याई ) पेक्षा रमजानमध्ये मिळणारी नेकी ही ही तब्बल सत्तर पटीने जास्त असते . त्यामुळे मुस्लिम बांधव जास्तीतजास्त नेकी कमाविण्यासाठी पवित्र रमजान महिन्यात संसार , व्यापार आदींचा त्याग करून अल्लास शरण जातात .

पहिली ईद :– जंग ए बदार ची लढाई जिंकल्यानंतर खुद्द पैगंबरांनी त्यांच्या अनुयायांसह पहिली ईद–अल–फित्र साजरी केली होती . पवित्र कुरान याच महिन्यात अवरतले असल्यामळे इस्लाममध्ये रमजानला अनन्यसाधारण महत्व आहे .

शिरकुर्माचे खास जेवण : – ईदच्या दिवशी सकाळी नमाज अदा झाल्यानंतर पहिल्यांदा दहीभात आणि साखरेचे जेवण होते . त्याचवेळी खजूर खाण्याचीही पद्धत आहे . कारण महंमद पैंगबर व त्यांच्या कुटूंबातील लोकांना हाच पदार्थ उपलब्ध होता , अशी समजूत आहे . दुधात शेवया टाकून खीर खाण्याची व इतरांना देण्याची पद्धत आहे . यावेळी मिठाई व शिरखुर्मा हे पदार्थ आवर्जून दिले जातात .

का साजरी केली जाते रमजान ईद : – रमजान म्हणजे बरकती आणि ईद म्हणजे आनंद . परस्परांमध्ये स्नेहभाव वाढविणारा हा महिना . रमजान ईद या दिवसाला ईद उल फित्र असेही म्हणतात . हा महिना व हा दिवस मुस्लिम धर्मियांसाठी अत्यंत पवित्र व मंगलमय असा मानला जातो . इस्लामिक दिनदर्शिकेनुसार मुस्लिम बांधव रमजानच्या महिन्यात २९–३० दिवसांचा रोजा ठेवतात . त्यानंतर शव्वालच्या पहिल्या तारखेला ईद–उल–फित्र म्हणजे ईद ही चंद्रदर्शनाने साजरी केली जाते . मुस्लिम बांधव महिनाभराचे उपवास करण्याची ताकद दिल्याबद्दल अल्लाहचे आभार मानतात . रमजानमध्ये जकात म्हणून गरिबांना मदत केली जाते व दानधर्म केला जातो . अशा या पवित्र रमजान महिन्याच्या सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा !

– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके,
तहसीलदार , बीड

## पान 1 वरून पुढे...

### अंबाजोगाई कृषी तंत्र....

इमारतींसाठी प्रत्येकी १४ कोटी ८७ लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली. यापैकी प्रत्येकी एक कोटी असा एकूण दोन कोटींचा निधी वितरीत करण्यास शासनाने गुरुवारी (दि. २७) मंजुरी दिली आहे. या शासन निर्णयामुळे अंबाजोगाईतील विद्यार्थ्यांना राहण्यासाठी उत्तम सुविधा मिळणार आहेत. दरम्यान, अंबाजोगाईमध्ये कृषि क्षेत्राच्या सुधारणा, तंत्रज्ञानाचा विकास आणि विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी शासनाचे विशेष लक्ष आहे. कृषी शिक्षणाच्या विकासासाठी शासनाने भांडवली निधी मंजूर करत संबंधित कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शासनाने मंजूर केलेला हा निधी वेळेत वितरित करून कामे जलद गतीने पूर्ण करण्याचा प्रयत्न होणार आहे. नवीन वसतिगृह इमारती उभारल्याने विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि चांगल्या सोयी–सुविधा मिळतील. हे काम वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे. यामुळे कृषि शिक्षणाच्या दर्जामध्ये मोठी सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांचा हिताचा विचार करत वसतिगृहासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, ना. पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत...

### वाल्मिक कराडच्या...

सुत्रधार वाल्मिक कराडच असल्याचे दोषारोपपत्रात सांगितले आहे, यावर मंत्री पंकजा मुंडे यांनी भाष्य केलं आहे.पुण्यामध्ये कार्यक्रमासाठी आलेल्या पंकजा मुंडे यांनी पत्रकारांनी सीआयडी कडून दाखल करण्यात आलेल्या दोषारोपपत्रामध्ये वाल्मिक कराड याचा उल्लेख असल्याबाबत विचारलं असता पंकजा मुंडे म्हणाल्या, 'याबाबत कोणतीही माहिती मला नाही. सीआयडीचा दोषारोप पत्र हा कॉन्फिडेन्शियल विषय असून सीआयडीकडून याबाबत ऑफिशियल माहिती जेव्हा येईल तेव्हाच याबाबत मी भाषा करेल. याबाबत गृहमंत्रालयाला माहिती असेल मला याबाबत माहिती नाही' बीडच्या गुन्हेगारीबाबत प्रश्न विचारला असता 'तो विषय आता मागे पडला आहे. मी आता पुण्यामध्ये आहे. पुण्यामध्ये महिलेवर स्वारगेट एसटी स्टँडमध्ये बलात्कार झाला आहे. मला तो प्रश्न विचारा मी पुण्यात आलेली आहे. तर मला बीडचे प्रश्न का विचारतात. ?' असे म्हणत पंकजा मुंडे चिडल्या.

### स्वारगेट बलात्कार....

कामगार संघटनेने नाराजी व्यक्त केली आहे. एसटी महामंडळाच्या चालक–वाहकांनी कर्तव्यावर असताना मोटार वाहन कायद्यातील तरतुदीनुसार निश्चित केलेला गणवेश परिधान करूनच कामगिरी करणे आवश्यक आहे, असे आदेश एसटी मुख्यालय असलेल्या महाराष्ट्र वाहतूक भवनमधून देण्यात आले आहेत.

सद्यस्थितीत खाकी गणवेशाशिवाय अन्य गणवेशात चालक–वाहक कर्तव्यावर असल्याचे दिसून येत आहे. यामुळे महामंडळाची जनमानासात प्रतिमा खराब होते. त्याचबरोबर प्रवाशांच्या मनात सुरक्षेबाबतही शंका उपस्थित होण्याची भीती निर्माण होण्याची शक्यता आहे. चालक–वाहक व सर्व गणवेशधारी कर्मचाऱ्यांना नेमून दिलेल्या गणवेशातच कर्तव्य बजावण्याचे आदेश वाहतूक विभागाने दिले आहेत.

सर्व कर्मचाऱ्यांनी गणवेश धारण करूनच कर्तव्य बजावायचे आहे. मार्ग तपासणी पथकामार्फत, सुरक्षा व दक्षता शाखेतील तपासणीसांकडून व आगारभेटीवेळी सर्व संबंधितांकडून गणवेश नियमांचे पालन होत असल्याचे तपासणी करणे गरजेचे आहे. नियम भंग करणाऱ्यांवर त्वरित कारवाई करण्यात यावी, असे या आदेशात म्हटले आहे. एखादी माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडल्यानंतर एसटी प्रशासनाला जाग येते आणि चालक वाहक व इतर गणवेशधारी कर्मचाऱ्यास जाचक होणारे आदेश काढण्यात येतात. 'गणवेशाचे कापड दिले, मात्र शिलाई मिळाली नाही, अशी प्रतिक्रिया एसटी कामगार संघटनेने दिली आहे.

खाकी टी–शर्टलाही बंदी

स्वारगेट प्रकरणानंतर प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून, कोणत्याही परिस्थितीत चालक–वाहकांना खाकी रंगाचे लोगो एम्ब्रॉयडरी केलेले टी–शर्ट गणवेश म्हणून परिधान करण्यास पूर्ण बंदी घालावी, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

### अजितदादा पवार...

याप्रसंगी डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य अविरत सुरू आहे. बीड लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघाचे निवडणुकीचे निकाल अनपेक्षित लागले. पराभव मान्य करून आपण कामाला लागलो. अजितदादा पवार हे कार्यक्षम नेतृत्व आहेते. त्यांच्या नेतृत्वात पक्ष संघटन मजबूत होत आहे. जातपात, धर्मभेदाला त्यांच्याकडे थारा नाही. विकासाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी अजितदादा कटिबद्ध असतात. पालकमंत्री पद त्यांच्याकडे असल्याने जिल्ह्याचा विकास आता कुणीही थांबवू शकत नाही. जिल्ह्यात चांगले अधिकारी येतील. अजितदादांकडून बीडसाठी विशेष अधिकारी दिला जाणार आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड विधानसभा मतदारसंघातून जिल्ह्यात सर्वाधिक पक्ष सदस्य नोंदणी करू, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक इंगळे यांनी केले. सूत्रसंचलन करून प्रा.पांडुरंग सुतार यांनी आभार मानले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, महिला–पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आरटीई अंतर्गत...

संत ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल शाळेत आरटीई प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनि खोटे कागदपत्र जसेकी आधार, भाडेपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र दाखल करून प्रवेश मिळवले आहेत.तेव्हा तालुका स्तरीय निवड समितीने महिनाभराच्या कालावधीत अपडेट केलेले आधार तपासावेत ज्या पत्त्याचा आधार असेल त्यांचे आणखी एक रहिवासी पुरावा घ्यावा, भाडेपत्र सदर केलेल्या पालकांच्या सदर केलेल्या भाडेपत्र ठिकाणी पालक राहतात का यासाठी त्यांच्या घरी भेट द्यावी आणि उत्पन्नाचे प्रमाणपत्र हे अर्ज दाखल करण्या पूर्वीचे घ्यावे जेणे करून आरटीई बोगस प्रवेशला आळा बसलेल आणि खऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतील असे निवेदनात मनोज जाधव यांनी म्हटले आहे.

## पान ४ वरून पुढे...

### ई पीक पाहणी....

उपविभागीय अधिकारी , तहसीलदार यांचा आढावा घेतला . राज्यात एकूण झालेल्या पिकपाहणीचा विचार करता बीड जिल्ह्याचा चौदावा क्रमांक आहे . तथापि जिल्ह्यात जास्तीत जास्त ईपीक पाहणी व्हावी , ग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावे . यासाठी संपूर्ण महसुल विभाग प्रयत्नशील असल्याचे दिसून आले .

बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी बीड सह गेवराई आणि शिरूर तालुक्यात बैठका घेऊन वेळोवेळी सूचना देऊन व ग्रीस्टॅकची कामे वेळेवर होतील यासाठी प्रयत्न केल्याचे दिसते .

शेतकऱ्याने पेरलेल्या पिकाची अचूक नोंद शासन दप्तरी व्हावी आणि शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा व्हावा या दृष्टीने ' ई–पीक पाहणी ' प निर्माण करण्यात आले आहे . या माध्यमातून शेतकऱ्याने कोणत्या गटामध्ये कोणते पिक घेतले आहे याची नोंद तर होणारच आहे , शिवाय ते ठिकाण अक्षांश / रेखांशमध्ये नोंद केले जाणार आहे . ई–पीक पाहणी कशी करायची ? : – शेतकऱ्याने स्वत: अथवा सहायकाने शेतातल्या पिकांची नोंद ऑनलाईन पद्धतीनं सातबारा उताऱ्यावर नोंदवणे याला ई–पीक पाहणी असं म्हटलं जात . गेल्या ४ वर्षांपासून महाराष्ट्र सरकार हा उपक्रम राबवत आहे . पिकांची नोंद करण्यासाठी सगळ्यात आधी ई पीक पाहणी हे प डाऊनलोड कराव लागत . त्यासाठी प्ले–स्टोअरवर जाऊन तिथ ई पीक असं सर्च करावे . त्यानंतर इन्स्टॉल वर क्लिक करायच . टप्प्या टप्प्याने पुढील नोंदी कराव्या . ई–पीक पाहणीचे फायदे काय ? : – ई – पीक पाहणी करताना दिलेली माहिती पुढील प्रकारचे लाभ देण्यासाठी वापरली जाते . एम एस पी मिळवण्यासाठी – तुम्हाला जर तुमचा शेतमाल किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत विक्री करायचा असेल तर त्यासाठीही तुमच्या संमतीनं हा डेटा वापरला जाऊ शकतो . पीक कर्जाच्या पडताळणीसाठी – तुम्ही ज्या पिकावर कर्ज घेतलंय , तर तेच पिक लावलं का , याची बँक हा डेटा पाहून पडताळणी करू शकते . १०० च्या वर बँका आजघडीला हा डेटा वापरत आहेत . पीक विमा योजनेच्या लाभासाठी – पीक विम्यासाठी अर्ज करताना नोंदवलेलं पीक आणि ई–पीक पाहणीत नोंदवलेलं पीक , यात तफावत आढळल्यास पीक पाहणीतील पीक अंतिम गृहित धरलं जात . नुकसान भरपाईसाठी – नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचं नुकसान झाल्यास भरपाई देण्यासाठी हा डेटा वापरला जातो . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची मागील आठ दिवसापासून या कामाचा मोठ्या प्रमाणात पाठपुरावा केल्याचे दिसून येत आहे . त्यांनी स्वतंत्र आदेश काढून २४ ते २८ तारखेपर्यंत सर्व नायब तहसीलदार , सर्व मंडळ अधिकारी , सर्व ग्राम महसूल अधिकारी म्हणजेच तलाठी यासह ग्राम महसूल सेवक म्हणजे कोतवाल यांनी ई पीक पाहणी आणि ग्रीस्टॅकच्या कामासाठी क्षेत्रीय स्तरावर गावोगावी फिरून काम करण्याबाबत लेखी आदेश काढले . दोन दिवस मुदत वाढल्यामुळे शुक्रवारी २८ तारखेला सायंकाळी बैठक घेऊन पुन्हा दोन दिवसात ईपीक पाहणी वर पूर्ण लक्ष देण्यासाठी मंडळ अधिकारी , तलाठी यांना आवाहन केले . त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी , ग्राम महसूल सेवक हे उन्हातान्हात ईपीक पाहणी करत असल्याचे चित्र दिसत आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांनाही आवाहन केलेले आहे की ईपिक पाहणीचे फायदे लक्षात घेता , त्यांनी सुद्धा महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांना सहकार्य करावे , ईपीक पाहणी करून घ्यावी तसेच ग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत फार्मर आयडी काढून घेण्याबाबतही त्यांनी आवाहन केलेले आहे . तहसीलदारांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून नायब तहसीलदार सुहास हजारे , सुरेंद्र डोके , प्रशांत जाधवर , प्रशांत सुपेकर हे गावोगावी शेतात फिरत असल्याचे चित्र दिसत आहे . २८ फेब्रुवारी च्या अहवालाचा विचार केला असता सर्वाधिक ई पीकपाहणी अंबाजोगाई तालुक्यात ४१ टक्के इतके दिसून आली . तर सर्वात कमी पाटोदा तालुक्यात झाली असल्याचे दिसले . दोन मार्चपर्यंत ई पिक पाहण्याचा कालावधी वाढविण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांनी सुद्धा ईपिक पाहणी साठी महसूल विभागास सहकार्य करणे आवश्यक आहे .ग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत बीड जिल्ह्यात सर्वाधिक अंबाजोगाई तालुक्यात ७० टक्के शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घेतलेले आहेत . बीड तालुक्याचा विचार करता बीड तालुक्यात एकूण खातेदार एक लाख वीस हजार सहाशे नव्वद इतके असून त्यापैकी पीएम किसान योजनेचे लाभार्थी ५९५३० इतके आहेत . ग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत आतापर्यंत ३४ हजार ६६५ शेतकऱ्यांनी म्हणजेच ५९% शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घेतलेले आहेत . इतर शेतकऱ्यांनी सुद्धा फार्मर आयडी काढावे आणि विविध लाभ घ्यावेत असे आवाहन बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले आहे .

### न्यू व्हिजन पब्लिक...

उद्घाटन प्रसंगी संस्थेचे सचिव राजकिशोर मोदी , कार्यकारी संचालक संकेत मोदी , जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्याधर, ॲड संतोष पवार, कराटे प्रशिक्षक शारदा प्रसाद साहू , मार्गदर्शक वसंत चव्हाण , प्रा . विवेकानंद राजमाने , संस्थेचे प्राचार्य रेंजो आर चंद्रन,उद्योजक धनराज सोळंकी ,शालेय पालक समितीच्या सदस्या श्रीमती सविता बुरांडे , डॉ. अर्चना थोरात , डॉ. हिरा बजाज , अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य हिरामण पुजडेकर , प्रा. संतोष तर्के हे उपस्थित होते . राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून न्यू व्हिजन पब्लिक स्कूल मध्ये विद्यार्थी विज्ञान मेळावाआयोजित करण्यात आला होता. या विज्ञान मेळव्यात इयत्ता चौथी ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी स्वयंचलित प्रकल्पासह विविध खगोलीय प्रकल्प विद्यार्थ्यांनी सादर केले होते. *लोकांसाठी विज्ञान आणि शाश्वत भविष्यासाठी परिवर्तनीय तंत्रज्ञान या थीमसह Innovation हील , Discovery den, Sci-Fi reality ,Wonder works , Tech Titans ,Eco heaven Science arcade ,Mystery science , Mind sparks , Future Frontier अशा विविध प्रकारच्या थीम तथा विषयावर दालनात सुमारे ११० प्रकल्पांचे विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. शालेय अटल टिंकरींग लॅब अंतर्गत विविध यंत्रांचे प्रदर्शन देखील या विद्यार्थी विज्ञान मेळाव्यात मांडण्यात आले होते . याप्रसंगी संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांनी न्यू व्हिजन पब्लिक स्कूल बाबत माहिती दिली. आपली संस्था ही स्थापनेपासूनच विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कला गुणांना वाव देऊन त्यांना प्रेरित करत असल्याचे नमूद केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास होऊन त्यांना त्यांच्या भावी आयुष्यात कसा उपयोग होईल याकडेही कटाक्षाने लक्ष केंद्रीत करून त्यांना सतत प्रेरित करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे देखील संकेत मोदी यांनी नमूद केले. या विद्यार्थी विज्ञान मेळाव्यास ॲड संतोष पवार यांनी देखील शुभेच्छा दिल्या. या विज्ञान मेळाव्यात उद्घाटन म्हणून उपस्थित असलेले माजी प्राचार्य डॉ कमलाकर कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आजचा विद्यार्थी हा विविध बाबींबाबत वैज्ञानिक दृष्टीकोन उलगडून पहात आहे याबाबत समाधान व्यक्त केले. याचेच फलित आज या मेळाव्यात विद्यार्थी विज्ञानिक निष्ठा जपून आधुनिक तंत्रज्ञानाचा मानवी जीवनात कसा उपयोग करून घेता येतो हे दाखवून देत आहेत. विद्यार्थ्यांनी या मेळाव्याद्वारे शाळेचा संपूर्ण परिसर विज्ञानमय केला आहे. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल निर्माण झालेली जागरूकता ही अत्यंत अभिमानास्पद बाब असल्याचे यावेळी प्राचार्य डॉ कमलाकर कांबळे यांनी प्रामाणिक पणे नमूद केले. विद्यार्थी विज्ञान मेळाव्यासाठी संस्थेतील सर्व विद्यार्थी आणि शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रचंड मेहनत घेतली . या विज्ञान मेळाव्यास संस्थेचे संस्थापक, कार्यकारी संचालक तसेच उपस्थित सर्व मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या .

### धारुर तालुक्यात...

अफूची शेती पिकवली आहे. याबाबत बीड एलसीबीकडे माहिती प्राप्त झाल्यानंतर पथकाने तीन अधिकाऱ्यांसह १२ पोलीस कर्मचारी घेऊन दुपारी बारा वाजल्यापासून या ठिकाणी कार्यवाही सुरू केलेली आहे. सायंकाळी सहा वाजता त्या तीन गुंठे शेतीतील अफू उपटून घेण्यास सुरुवात केली आहे. अफू उपटून घेतल्यानंतर त्याचं जे वजन एकत्रित होणार आहे त्यानुसार किती लाखाचा मुद्देमाल पकडला याबाबत पोलिसांकडून सविस्तर माहिती दिली जाईल असं सांगण्यात येत आहे. तत्पूर्वी धारूर तालुक्यात अफूची शेती आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. या अफूच्या माध्यमातून नशेखोरांना नशा करण्यास अफूचा उपयोग होतो आणि त्यासाठीच नशेखर अफूचा उपयोग करून घेतात. रामहरी तिडके यांनी शेततळे खोदून त्याच्याद्वारे अफूला पाणीपुरवठा करत अतिशय दुर्गम भागात जिथे सहज जाणं शक्य नाही अशा ठिकाणी अफूची शेती पिकवली आहे. अफू पिकवणे कायद्याने निर्बंध घातलेले असताना रामहरी कारभारी तिडके या शेतकऱ्याने अफूची शेती पिकवल्यामुळे पिंपरवाडा गाव चर्चेत आला आहे.

दुर्गम भागात शेततळ्याच्या आधारे अफूची पिकवली शेती– तालुक्यातील बालाघाट पर्वत रांगांमध्ये येत असलेल्या पिंपरवाडा गावाच्या शिवारात जहागीरमोहा पिंपरवाडा आणि चोंडी या तीन गावांच्या केंद्रस्थानी असलेल्या अतिशय दुर्गम भागात शेततळ्याच्या माध्यमातून तीन गुंठे जमीन ओलिताखाली आणत रामहरी कारभारी तिडके या शेतकऱ्याने अफू पिकवला आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी पोलिसांनी तोफू एकत्र करण्यास सुरुवात केली आहे अंदाजीत ४० ते ५० गोण्यापेक्षा अधिक तिथे असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.

### छत्रपती शिवरायांबद्दल...

ईतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्याचे नाव घेऊन सदर व्यक्तीने हे वक्तव्य करत धमकी दिल्यामुळे हे प्रकरण अत्यंत संवेदनशील असुन तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत करण्यात आली आहे. यावेळी आंदोलनात राजेभाऊ आप्पा गिरे, सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती अध्यक्ष अशोक वाणी, विक्रांत वाणी,ॲड. गणेश वाणी,बाळकृष्ण थोरात, भगवान मोरे ,लक्ष्मण वाणी, भालचंद्र गिरे, दादा गायकवाड, नामदेव वाणी, सौरभ जाधव,रत्नाकर वाणी,संजय पावले, अशोक जाधव,पांडुरंग कानडे , कृष्णा कानडे, हनुमंत निर्मळ आदी सहभागी होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात

### नवी मुंबईतील एज्युसिटीला केनेडीकट राज्याची मदत



**मुंबई । प्रतिनिधी**

नवी मुंबई परिसरामध्ये नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ व दळणवळणाच्या दर्जेदार सुविधांमुळे तिसरी मुंबई विकसित होत आहे. सर्व सुविधा लक्षात घेता नवी मुंबईत नवीन 'एज्युसिटी' निमर्णि करण्याचा राज्य शासनाचा मानस असून त्यासाठी अमेरिकेतील केनेडीकट राज्याची मदत मिळेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. सह्याद्री अतिथिगृह येथे कनेक्टिकट राज्याचे गव्हर्नर नेड लॅमांट व त्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान ' एज्यूसिटी' उभारण्याबाबत मुख्यमंत्र्यांशी सकारात्मक चर्चा झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या 'पॉवर हाऊस'सोबतच तंत्रज्ञान आणि करमणुक क्षेत्राचे हब आहे. देशातील एकूण परकीय गुंतवणूकीपैकी ४० टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आहे. राज्यात देशाच्या ६० टक्के डेटा सेंटर क्षमता आहे. राज्याला २०३० पर्यंत १ हजार अमेरिकन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याचे उद्दिष्ट राज्य शासनाने ठेवले आहे. यापैकी राज्याने सध्या निम्मे उद्दिष्ट साध्य केले आहे.

### महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'माविम'ने कार्याची व्याप्ती वाढवावी - महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे



**मुंबई । प्रतिनिधी**

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर महामंडळाच्या कामाची व्याप्ती वाढविण्यात यावी. बचतगटांमार्फत जन सुविधा केंद्रांची देखभाल करण्याबाबत तसेच सर्व्हिस सेक्टरमध्ये रोजगाराच्या जास्तीत-जास्त संधी उपलब्ध करून देणे व शहरी भागातील महिलांना आर्थिकरित्या सक्षम करण्यासाठीच्या योजनांसंदर्भातील प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. मंत्रालयात महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कामकाजासंदर्भात आढावा बैठक झाली. यावेळी सचिव डॉ. अनुपकुमार यादव, माविमच्या व्यवस्थापकीय संचालक वर्षा लड्डा, विभागाचे सहसचिव श्री. ठाकूर, 'माविम'चे सहायक व्यवस्थापक श्री. गमरे, सल्लागार कुसूम बाळसराफ आदिसह अधिकारी उपस्थित होते.

### 'जागतिक महिला दिनानिमित्त' 'जय महाराष्ट्र' 'दिलखुलास', कार्यक्रमात महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांची मुलाखत



**मुंबई । प्रतिनिधी**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' कार्यक्रमात 'जागतिक महिला दिनानिमित्त' महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांच्या विशेष मुलाखतीचे प्रसारण होणार आहे. 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार दि. ४ मार्च २०२५ रोजी रात्री ८.०० वा. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे. तर 'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत गुरूवार दि. ६, शुक्रवार दि. ७, शनिवार दि. ८ मार्च २०२५ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व 'न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल पवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. निवेदिका डॉ. मृण्मयी भजक यांनी ही मुलाखत घेतली आहे.समाजाच्या विकासात महिलांची भूमिका अत्यंत मोलाची आहे. महिलांना समान हक्क मिळणे तसेच त्यांच्या अधिकारांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी ८ मार्च रोजी 'जागतिक महिला दिवस' जगभरात साजरा केला जातो. याअनुषंगानेच महिला सबलीकरण, त्यांच्या हक्कांचे संरक्षण, लहान मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच त्यांच्या सशक्तीकरणासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महिला व बालविकास मंत्री यांच्या नेतृत्वाखाली शासन सातत्याने प्रयत्न करित आहे. याचेच एक उदाहरण म्हणजे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना' या आणि अशा अनेक योजना, धोरणात्मक निर्णय आणि विविध उपक्रम महिलांसाठी राबविण्यात येत आहेत. विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या या योजना आणि निर्णयांबाबत महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' कार्यक्रमात माहिती दिली आहे.

# कॉपीमुक्त अभियानाचा उडाला फज्जा

## धारूरमध्ये दहावी इंग्रजीचा पेपर फुटला; दोघे पोलिसांच्या ताब्यात

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

एसएससी बोर्ड दहावीच्या परीक्षा सध्या सुरू आहेत.१ मार्च शनिवार रोजी इंग्रजीचा पेपर असल्याने शिक्षण विभागाकडून विशेष खबरदारी घेतल्यानंतरही दोन मुलांनी साडेअकरा वाजता इंग्रजीचा पेपर खिडकीतून घेऊन पलायन केले. पेपर फुटल्याची बातमी सर्वत्र चर्चिली जात असतानाच पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी अतिशय शिताफीने अवघ्या अर्ध्या तासात पेपर फोडणाऱ्या दोघांनाही ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवत फोडलेला पेपर जमा करून घेतला.



कॉपीमुक्त अभियाना अंतर्गत बोर्ड परीक्षा मागील काही वर्षात धारूर शहरात शांततेत आणि व्यवस्थित पार पडत होत्या.परंतु यंदा सध्या सुरू असलेल्या एसएससी बोर्ड दहावीच्या १ मार्च शनिवार रोजी होत असलेल्या इंग्रजी पेपर काही पोरांनी फोडल्याची घटना धारूर शहरातील जिल्हा परिषद शाळेतील परीक्षा केंद्रावर घडली. सदरील बाबीची माहिती मिळतात पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी अवघ्या अर्ध्या तासात सीताफिने त्या पेपर फोडणाऱ्या पोरांना ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवत पेपर उपलब्ध करून घेतला. परंतु बोर्ड परीक्षा त्यातच इंग्रजी चा पेपर अर्धा ते पाऊण तासात फुटला असल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये आता संभ्रम निर्माण झाला आहे. सदरील पेपर फुटलेल्या प्रकारणी ४ जनावर गुन्हा नोंद करण्यात आली आहे.

## धर्मवीर प्रतिष्ठान आयोजित भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ

**बीड । प्रतिनिधी**

धर्मवीर प्रतिष्ठान आयोजित भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा बीड तालुक्यातील काकडहिरा ता. जिल्हा बीड येथे पार पडली यावेळी बीड जिल्ह्यातील अनेक संघानी या स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेचे उद्घाटन बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने लिंबाजी मामा जाधव हस्ते करण्यात आले होते.आज धर्मवीर प्रतिष्ठान आयोजित भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा शेवटचा सामना मोटे इलेव्हन बीड व शिवनेरी क्रिकेट क्लब बीड यांच्या मध्ये पार पडला.



या अटीतटीच्या सामन्यात मोटे इलेव्हन संघ मोठ्या फरकाने विजयी झाला.ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी धर्मवीर प्रतिष्ठानचे सहकारी सदस्य व काकडहिरा ग्रामपंचायतचे उपसरपंच विशाल बागलाने व धर्मवीर प्रतिष्ठानच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेऊन ही स्पर्धा यशस्वी रित्या पार पाडली आज शेवटच्या सामन्या नंतर विजयी संघाला धर्मवीर प्रतिष्ठान कार्यालय व बाजीराव दादा चव्हाण जनसंपर्क कार्यालय बीड येथे बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने धर्मवीर प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष लिंबाजी मामा जाधव,शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महादेव मातकर यांच्या हस्ते मोटे इलेव्हन संघाचे कॅप्टन विवेक मोटे यांच्याकडे ५१ हजार रुपये रोख बक्षिस व ट्रॉफी देऊन विजयी संघाचे अभिनंदन करण्यात आले.यावेळी विशाल बागलाने,रोहित धुरंधरे, पंकज कदम, विलास मस्के,संदीप माने, ज्योतीराम फरताडे, सचिन गाडे, यांच्यासह धर्मवीर प्रतिष्ठानचे सहकारी उपस्थित होते.

## अध्यापकांच्या भरती प्रकियेस मान्यता ; नवीन कार्यपद्धतीचा होणार अवलंब

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील अकृषी विद्यापीठांमधील अध्यापक पदांच्या भरती प्रक्रियेस मान्यता देण्यात येत आहे. निवड प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि निष्पक्षता येण्यासाठी यापुढे राज्यात अध्यापक पदांच्या भरती प्रक्रियेसाठी नवीन कार्यपद्धतीचा अवलंब होणार आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, राज्यपाल तथा कुलपती यांच्या मार्गदर्शनानुसार राज्यातील विद्यापीठांमध्ये सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांच्या निवड प्रक्रियेसाठी गुणांकन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये शैक्षणिक क्रेडेन्शियल आणि त्यांची मुलाखतीमधील कामगिरी गृहीत धरण्यात येणार आहे. या दोन्ही बाबी एकत्रित करून अधिक पारदर्शक, निष्पक्ष निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि अध्यापनाला ८० टक्के गुण (वेटेज) तर मुलाखतीसाठी २० टक्के गुण (वेटेज) देण्यात येणार आहे. एकत्रित १०० गुणांपैकी किमान ५० टक्के गुण मिळवलेल्या उमेदवारांनाच अंतिम निवडीसाठी पात्र असतील.

## जगद्गुरु श्री संत तुकोबाराय यांच्या त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सव बीज सोहळ्यानिमित्त, संगीतमय श्रीमद् भागवत कथा सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील नांदूर फाटा जवळील खर्डेवाडी ता. जि.बीड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पाचवा वेद निर्माते जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा बीजसोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे या बीज उत्सवानिमित्त दि.०९/३/२०२५ रोजी संगीतमय श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा प्रारंभ होणारआहे .या संगीतमय श्रीमद् भागवत कथा प्रवक्त्या ह.भ.प. सौ.साक्षीताई कराडकर सद्गुरु बंकट स्वामी संस्थान आळंदी देवाची या आहेत . कथा वेळ दुपारी १ ते



५ आहे.सात दिवस चालणाऱ्या भक्ती ज्ञान यज्ञ सोहळ्यात सकाळी काकडा भजन, दुपारी भागवत कथा व संध्याकाळी सहा ते सात या वेळेत भजनी मंडळ खर्डेवाडी यांचा हरिपाठ व रात्री परिसरातील गावकऱ्यांचा हरिजागर होणार .या संगीतमय भागवत कथेसाठी तबलासाथ ह.भ.प.श्री.राम महाराज गायकवाड, सिंथवादन व गायन ह.भ.प.श्री.तुकाराम महाराज कराडकर, गायन साथ ह.भ.प. शालिनीताई जाधव , बीड, ऑक्टोपॅड वादन श्री. रवी महाराज हिंगोली यांची आहे.या सप्ताहात गुरुवार दिनांक १३/३/२५ होळीनिमित्त व कै. रत्नदीप कळेकर यांच्या तेराव्या पुण्यस्मरणानिमित्त ह.भ.प.श्री.भरत महाराज साळुंके ज्ञानराज वारकरी शिक्षण संस्था मंठा जिल्हा जालना यांचे रात्री ९ते ११ कीर्तन सेवा होणार आहे.

## संस्कार विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

संस्कार विद्यालय बीड येथील इयत्ता तिसरी चौथी विभागात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या साळुंके ताई लाभल्या. यावेळी सर्वप्रथम विभाग प्रमुख गिरी सर व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते डॉ. सी व्ही रमण यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. त्यानंतर ठाकूर ताई यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या साळुंके यांनी सी.व्ही रमन यांच्या रमण इफेक्ट विषयी माहिती व राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांकडून वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संकल्प करून घेतला.तसेच तिसरी चौथीचे विभाग प्रमुख गिरी सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत जोशी सर यांनी तर आभार प्रदर्शन पानखडे ताई यांनी केले.कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, कर्मचारी व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.



## कऱ्हेवडगाव येथे शेतकरी ओळखपत्र काढण्यासाठी कॅम्प संपन्न मा. सरपंच जालिंदर गायकवाड यांनी घेतला होता पुढाकार

**आष्टी । प्रतिनिधी**

सध्या शेतकऱ्यांना कोणत्याही कृषी योजनेसाठी अर्ज करण्यापूर्वी प्रत्येक वेळी पडताळणी करावी लागते. त्यात खर्च तर होतोच पण शेतकऱ्यांना हेलपाटे मारावे लागतात. कधी माहिती वेळेत भरली जात नाही तर कधी कागदपत्र वेळेवर मिळत नाहीत, त्यामुळं शेतकऱ्यांना मनस्तापही सहन करावा लागतो. शेतकऱ्यांची वैयक्तिक माहिती त्यामध्ये नाही. त्यामुळं नवीन नोंदणी करून शेतकऱ्यांची संपूर्ण माहिती एका क्लिक वर



आणण्याचं केंद्र सरकारचं उद्दिष्ट आहे. तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी शेतकरी ओळखपत्र काढून घ्यावे असे आव्हान महसूल प्रशासनाच्या वतीने करण्यात आले होते परंतु ग्रामीण भागातील शेतकरी बांधवांना ओळखपत्र काढण्यासाठी सेतू सुविधा केंद्रावर तासनतास रांगेत उभे राहावे लागत असे. तसेच गावामध्ये सुविधा उपलब्ध नसल्याने इतर ठिकाणी जावे लागत असे. वयोवृद्ध तसेच सर्वसामान्य शेतकरी बांधवांना त्रास कमी व्हावा यासाठी गावचे मा. सरपंच जालिंदर गायकवाड यांनी पुढाकार घेऊन महसूल प्रशासनाच्या हि बाब लक्षात आणून दिली. कऱ्हेवडगाव येथील सभामंडपामध्ये सदरील कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पमध्ये गावातील शंभर पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी ओळखपत्र काढून घेतले आहे. ओळखपत्र काढण्यास गावातच सुविधा उपलब्ध झाल्याने शेतकरी बांधवांनी महसूल प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी तसेच मा.सरपंच जालिंदर गायकवाड यांचे विशेष आभार मानले आहेत.

## वाढदिवसाचा अनर्थ खर्च टाळत शालेय साहित्याचे वाटप करुन डॉ.किशोर बांगर यांचा वाढदिवस साजरा

**आष्टी । प्रतिनिधी**

वाढदिवसाचा खर्च नाहकपणे करून उधळपट्टी करण्यापेक्षा हाच पैसा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यात उपयोगात आणून त्यांच्या गरजा पूर्ण केल्या तर विद्यार्थ्यांची शालेय गोडी वाढून त्यांच्या गरजा पूर्ण होवू शकतात. हा उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून तालुक्यातील कऱ्हेवडगांव येथील युवा नेते डॉ. किशोर बांगर या तरुणाने आपला वाढदिवस गावातील शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करुन सामाजिक बांधिलकी जोपासत वाढदिवस साजरा केला.

तालुक्यातील कऱ्हेवडगांव येथील पशुवैद्यकीय सेवा करणारे डॉ.किशोर बांगर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त कऱ्हेवडगांव येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले ८० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक बापु जायभाय,शिक्षिका रंजना खाडे,शिक्षक सरोदे,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश टकले, उपाध्यक्ष महेश सांगळे, मुकादम आत्माराम नागरगोजे, शरद खांडवे,गहिनीनाथ नागरगोजे, जालिंदर खांडवे, ग्रा.पं. सदस्य शुभम खांडवे,उपस्थित होते.

## श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे मराठी राजभाषा दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

कवी साहित्यिक कादंबरीकार विष्णू वामन शिरवाडकर म्हणजेच कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी दिन म्हणून साजरा करण्यात आला या कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने झाली. या कार्यक्रमासाठी शाळेतील अध्यक्ष पारगावकर , सचिव शेख पाशा , स्नेहा पारगावकर मॅडम, उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम यांची उपस्थिती होती.



सुरुवातीला शाळेतील स्नेहा पारगावकर मॅडम यांनी उत्कृष्ट कविता सादरीकरण केले तसेच आपल्या शाळेचे अध्यक्ष पारगावकर सर यांनी मुलांना मराठी भाषेचे महत्त्व आणि कवी कुसुमाग्रज यांच्या विषयी सखोल माहिती दिली .आपल्या शाळेच्या उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्व आणि मराठी दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमांमध्ये आपल्या शाळेतील छोट्या गटातील आणि मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी मराठी भाषेविषयी कविता , अभंग ,श्लोक, सुविचार ,म्हणी ,मराठा दिनानिमित्त कविता, चारोळी ,ओवी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एक पात्री नाटक वऱ्हाड निघाले लंडनला हे नाटक आपल्या शाळेतील विद्यार्थिनी आरोही जोशी इन हिने उत्कृष्ट सादरीकरण केले.

मराठी दिनाच्या निमित्ताने मराठी विषय शिक्षकांचा सत्कार करण्यात आला .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता चौथीतील विद्यार्थिनी अनन्या खेत्रे आणि स्वानंदी पवळ या दोघींनी केले तसेच आभार प्रदर्शन इयत्ता चौथीतील विद्यार्थिनी आराध्या आझडे नी केले. मराठी विषय शिक्षक, विद्यार्थी आणि सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

# कला पथकाच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी वडवणीकरांच्या डोळ्याचे पारणे फेडले

## वडवणीत हजारोंच्या उपस्थितीत ऐतिहासिक शिवजन्मोत्सव सोहळा पार पडला







**वडवणी । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती वडवणी शहरात भुतो ना भविष्याती साजरी करण्यात आली आहे. यामध्ये विविध कला पथकाच्या चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. उंट, घोडे, महापुरुषांची वेशभूषा, सजवलेल्या मेघडंबरी राजमहालात छत्रपती शिवाजी महाराज यांची मुर्ती आकर्षक देखावा विविध कला सादर करुन ऐतिहासिक डिजेमुक्त सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला आहे. या सोहळ्याला मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी भेट दिली होती.

गेल्या आठ दिवसांपासून वडवणी येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सवाची तयारी अगदी जोमाने सुरू होती. शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी रोजी वडवणी शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा मेघडंबरी राजमहाल आकर्षक देखावा सादर करण्यात आला. तसेच कोल्हापूर येथील कलाकारांची प्रसिध्द नादमय ढोल ताशा ध्वजपथकाने ढोल ताशांच्या गजरात मंत्रमुग्ध केले. कोल्हापुर येथील युवक युवतींचे शिवकालीन युध्दकला खेळ पथकाने तलवारबाजी, तरुणांच्या पोटावरील केळी कापणे, तलवारीने लिंबू कापणे, काठी चालवणे, तलवार चालवणे, युद्ध खेळणे, अशा विविध चित्तथरारक कला सादर करून वडवणीकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. तर धार्मिक कार्यक्रमांमध्ये पारंपारिक वारकरी वेशभूषामध्ये बाल वारकरी भजनी मंडळातील विविध खेळ, टाळ खेळत छत्रपती शिवरायांच्या नामाचा जय घोष केला. महाराष्ट्रातील अकलुज येथील प्रसिध्द हलगी पथक, अलंकार बॅन्जो, उंट, घोड्यावर महापुरुषांची वेशभूषा करत बालकलाकारांनी देखावा सादर करत लक्ष वेधून घेतले होते. भव्य दिव्य मिरवणुकीमध्ये महिला व युवक पुरुषांना फेटेधारी महिला मंडळ व फेटेधारी युवक मंडळ, संपूर्ण शहरामध्ये निरनिराळ्या कलरमध्ये फटाक्यांची आतिषबाजी, वडवणी शहरात विद्युत रोषणाई, लेझर शो लाईट यांसह आदी भरगच्च कार्यक्रमांनी भूतो ना भविष्याची अशी डिजेमुक्त जयंती साजरी करण्यात आली आहे. या शोभायात्रेत महिलांसह शिवभक्त हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी वडवणी पोलिसांनी ठिकठिकाणी चोख बंदोबस्त ठेवत शांततेत शिवजन्मोत्सव शोभायात्रा पार पाडली. यावेळी, महिला, शिवभक्त, पोलीस, पत्रकार, यांचे सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने आभार मानण्यात आले आहे.

### संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी जयंतीला दिली भेट

**मराठा आंदोलनकर्ते मनोज दादा जरांगे पाटील यांनी वडवणी येथील शिवजन्मोत्सवाला भेट देऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मुर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. पाटील यांच्या भेटीने तरुणात नवे चैतन्य निर्माण झाले होते. यावेळी तरुणांनी प्रचंड घोषणाबाजी करत घोषणांचा पाऊस पाडला. यावेळी छोट्या तालुक्यात देखील विविध कला पथक, आणि सजावट पाहून मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी शिवजन्मोत्सव समितीचे कौतुक केले आहे.**

# तहसिल कार्यालयातील सच्चा सारथी भारत मुळूक सेवानिवृत्त

**बीड । प्रतिनिधी**

येथील तहसिल कार्यालयातील वाहन चालक या पदावर कार्यरत असलेले भारत मुळूक हे दि. २८ फैब्रुवारी २०२५ रोजी आपल्या सेवेतून निवृत्त झाले आहेत. गेली अनेक वर्षे महसुल विभागातील एक सच्चा सारथी म्हणून मुळूक यांनी कर्तव्य बजावलेले आहे. बीड येथील महसुल विभागातील आणि तहसिल कार्यालयात वाहन चालक पदावर कार्यरत असलेले भारत मुळूक हे वयोमानानुसार दि.२८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाले. आपल्या कर्तव्याशी अत्यंत प्रामाणिक राहून त्यांनी सेवा बजावली.बीड येथे कार्यरत असताना अनेक तहसिलदारांच्या वाहनाचे चालक म्हणून त्यांनी



उत्कृष्ट सेवा बजावलेली आहे. सर्व अधिकाऱ्यांसह, कर्मचाऱ्यांशी त्यांचे सलोख्याचे संबंध राहीले. आपल्या कार्यकाळात त्यांनी कर्तव्याला प्राधान्य देत केलेली सेवा महसुल विभागात उल्लेखनीय ठरली आहे. मुळुक यांनी २९ वर्ष सेवा केली असून त्यातील पंधरा वर्षे त्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तर तहसीलदार, पुरवठा अधिकारी यांच्यासोबत त्यांनी सेवा बजावलेली आहे.

# ई पीक पाहणी करण्यासाठी संपूर्ण जिल्हाभर महसूल विभागाची उन्हातान्हात धावपळ

## ई पीक पाहणी शेतकऱ्यांच्या हिताची : तहसीलदार शेळके

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात सध्या ई पीकपाहणी , ग्रीस्टॅक इत्यादी कामाची लगबग पाहायला मिळत आहे . बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे शेतकऱ्यांच्या हितासाठी नेहमी दक्ष असतात . शेतकऱ्यांना वेळेवर बी बियाणे , खते मिळावी , अनुदान रकमा वेळेत प्राप्त व्हाव्यात ,



विविध योजनांचे लाभ मिळावेत यासाठी ते कृषी विभाग , पंचायत विभाग , महसूल विभागाचा आढावा घेत असतात . रब्बीची ई पीक पाहणी करण्याची शेवटची तारीख २८ फेब्रुवारी होती . ती आता २ मार्चपर्यन्त करता येणार आहे . त्या अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी वेळोवेळी

▶▶ उर्वरित पान २ वर

# राजेश शिंदे यांचे हृदय विकाराच्या धक्क्याने निधन

**बीड । प्रतिनिधी**

संपूर्ण जिल्ह्यालाच नव्हे तर राज्याला हरहुन्नरी कलाकार म्हणून ओळख असलेले राजेश शिंदे यांचे शनिवारी हृदयविकाराच्या धक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर आज रविवारी सकाळी नऊ वाजता मोंढा अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. बीड जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला फोटोग्राफीच्या दुनियेचा बाप माणूस म्हणून परिचित असलेले राजेश शिंदे यांचे शनिवारी दुपारी हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाले. गेल्या अनेक वर्षापासून फोटोग्राफी



मध्ये जिल्ह्याचे नाव उंचावण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. असा हरहुन्नरी कलाकार आपल्यातून अचानक निघून गेला. .त्यांच्यावर रविवारी सकाळी नऊ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत आहे. पत्नी, दोन मुली, वडील ,भाऊ असा मोठा परिवार आहे.

# न्यू व्हिजन पब्लिक स्कुल येथे भव्य विज्ञान मेळावा संपन्न

## शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबाबत मोठया प्रमाणावर जागरूकता होणे ही बाब अभिमानास्पद- प्रा. डॉ. कमलाकर कांबळ

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व विज्ञानाबद्दल मोठया प्रमाणावर जागरुकता निर्माण होते आहे ही बाब विद्यार्थी व समाजासाठी अभिमानास्पद बाब असल्याचे स्पष्ट मत माजी प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे यांनी व्यक्त केले. ते अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळा अंतर्गत न्यू व्हिजन पब्लिक स्कूल येथे




राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. या विज्ञान मेळाव्याच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# धारुर तालुक्यात अफूच्या लागवडीचे धक्कादायक प्रकरण उघडकीस

**किल्ले धारुर । प्रतिनिधी**

अफू पिकवण्यावर शासनाने निर्बंध घातलेले असताना देखील धारूर तालुक्यातील (जि.बीड) पिंपरवाडा येथील रामहरी कारभारी तिडके या शेतकऱ्याने चक्क बालाघाट पर्वत रांगेतील अतिशय दुर्गम अशा भागात तीन गुंठे क्षेत्रावर शेततळ्याच्या माध्यमातून पाणी संकलित करत अफुची शेती पिकवली आहे. सदरील घटनेची माहिती मिळताच बीड एलसीबी धारूर पोलिसांच्या मदतीसह तीन अधिकारी आणि बारा पोलीस कर्मचाऱ्यांची शोध मोहीम यशस्वी झाली आहे. धारूर तालुक्यातील



पिंपरवाडा गावच्या शिवारात पिंपरवाडा चोंडी तसेच जहांगीर या तीन गावांच्या केंद्रस्थानी असलेल्या ठिकाणी रामहरी तिडके नावाच्या शेतकऱ्याने चक्क

▶▶ उर्वरित पान २ वर

# मिरकाळा येथे आज विवेकानंद शास्त्री यांचे कीर्तन; स्वररत्न अंजलीताई केंद्रे यांची भागवतकथा





**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील मिरकाळा येथे सालाबाद प्रमाणे रोकडसिद्ध कृपेने व संतश्रेष्ठ भगवानबाबा व संतश्रेष्ठ वामनभाऊ यांच्या आशिर्वादाने दि.२७ ते फेब्रुवारी २०२५ पासुन अखंड हरिनाम सप्ताह सुरू झाला आहे. तर भागवताचार्य स्वररत्न अंजलीताई केंद्रे यांच्या भागवत कथा दररोज दुपारी २.०० ते ५.०० दरम्यान सुरु आहे. दि. २ मार्च रोजी ह.भ.प. वेदांताचार्य विवेकानंद शास्त्री, शिरूर, दि. ०३ मार्च रोजी गणेश महाराज शास्त्री, दुर्गाशक्ती गड भिलवडे, दिनांक ४ मार्च रोजी स्वर रत्न वाणीभूषण ह भ प अंजलीताई केंद्रे उदगीर यांचे कीर्तन, दिनांक पाच मार्च रोजी ह भ प कृष्णा महाराज शास्त्री उत्तराधिकारी भगवानगड यांचे कीर्तन होणार आहे तर दिनांक ६ मार्च रोजी सकाळी ११.०० ते १.०० भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ.नामदेव शास्त्री महाराज यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. मिरकाळा येथील अखंड हरिनाम सप्ताहात स्वररत्न, वाणीभूषण अंजलीताई केंद्रे यांची भागवत कथा हे मुख्य आकर्षण आहे.




# छत्रपती शिवरायांबद्दल गरळ ओकणा-या कोरटकर विरोधात लिंबागणेशकरांचे जोडे मारो आंदोलन

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज , राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल आक्षेपार्ह व बदनामीकारक वक्तव्य करून शिवप्रेमींच्या भावना दुखावणा-या नागपुरच्या प्रशांत कोरटकर यांना तात्काळ अटक करून त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि. ०१ शनिवार रोजी सकाळी ११ वाजता लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोरदार घोषणाबाजी



करत प्रशांत कोरटकर यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला. ईतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना मोबाईल वरून धमकी देताना प्रशांत कोरटकर यांने महाराष्ट्राची अस्मिता असलेले रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल हिनकस वक्तव्य केले असुन दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न देखील केला आहे.तसेच विकृत लेखक जेम्स लेन यांनी छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल अत्यंत विकृत लिखाणाचे समर्थन करून तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत. मराठा समाजाला शिविगाळ करून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे तसेच

▶▶ उर्वरित पान २ वर